**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२३८/२०२६</u>**

**<u>निशाणी १ खालील आदेश</u>**

**०१.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जाव्दारे **खेड** पोलिस ठाणे, पुणे येथील **गु.र.क्र. २५६/२०२६** या कामी जप्त केलेला मुद्देमालाच्या अंतरिम ताब्याची मागणी केली आहे.

**<u>अर्जदार यांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालील प्रमाणे –</u>**

**०२.** अर्जदार याचे सदर गुन्ह्याकामी जप्त वाहन म्हणजे हुंडाई मोटार कंपनीची क्रेटा तिचा अधिकृत नोंदणी क्र. **MH** 14 **MZ** 7576 असा आहे. सदर वाहनाचा चेसीस क्र.**MALPBB**13**LSM**306042 व इंजिन क्र.**D4FASM**568718 असा आहे. सबब सदरचा मुद्देमाल हा अर्जदाराने बंधपत्रावर अंतरीम ताब्यात मिळणेबाबत विनंती केली आहे.

**०३.** अर्जाचे कामी तपासी अधिकारी व सहा. सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागवण्यात आले. सहा. सरकारी अभियोक्ता व तपासी अधिकारी यांनी अर्जदारास सदर वाहन अर्जदारास परत देण्यास हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार सदर वाहन हे गंभीर गुन्हयामध्ये वापरण्यात आलेले असून ते गुन्हयातील महत्वाचा पुरावा आहे, ते अर्जदारास परत केले तर अर्जदार त्यामध्ये फेरबदल करण्याची किंवा विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली.

**०४.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने एफ.आय.आर ची प्रत, वाहन नोंदणी प्रमाणपत्राची (Certificate of Registration) प्रमाणित प्रत, अर्जदाराच्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत इ.कागदपत्रे या कामी दाखल केलेली आहे. सबब सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार हे वर नमूद वाहनाचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदाराने कोर्ट आदेश करेल त्याप्रमाणे अटी मान्य करण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. तसेच सदर जप्त वाहनाचा ताबा अर्जदारा व्यतिरीक्त कोणीही मागितलेला नाही. या कामी जप्त केलेले वाहन हे पोलीस ठाणे आवारात तसेच आहे त्या स्थितीत पडून राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब वरील बाबी विचाराधीन घेता, मी या निर्णयाप्रत आली आहे की, अर्जदारास वर नमूद वाहनाचा अंतरिम ताबा हा योग्य त्या अटीवर देणे उचित होईल. सबब प्रस्तुत अर्जाचे कामी मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. **खेड** पोलिस ठाणे, पुणे येथील गु.र.क्र.२५६/२०२६ या कामी जप्त असलेली हुंडाई मोटार कंपनीची क्रेटा तिचा अधिकृत नोंदणी क्र. **MH 14 MZ 7576** असा आहे. सदर वाहनाचा चेसीस क्र.**MALPBB**13**LSM**306042 व इंजिन क्र.**D4FASM**568718 हिचा अंतरीम ताबा अर्जदारास रक्कम रुपये रु.१०,००,०००/– (रुपये दहा लाख मात्र) इतक्या रक्कमेचे हानिरक्षण बंधपत्र घेवून खालील अटीवर देण्यात यावा.

**अ)** अर्जदाराने कोर्ट हुकूम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल कोर्टासमोर हजर करावा.

**ब)** अर्जदाराने सदर मुद्देमालात कोणताही फेरबदल, हस्तांतरण तबदील अगर त्याची विक्री करणेची नाही.

**क)** अर्जदारने मुद्देमालाचा अंतरीम ताबा घेताना मुद्देमालाच्या सद्यस्थिती दर्शविणारे चार छायाचित्रे तपासी अधिकारी यांच्या स्वाधीन करण्याची आहेत.

**ड)** तपासी अधिका–याने मुद्देमालाचा अंतरीम ताबा देताना तपशिलवार पंचनामा करुन तो या गुन्हयाकामी दाखल होणा–या दोषारोपपत्रासोबत सादर करणेचा आहे.

**इ)** या आदेशाची प्रत तपासी अधिकारी यांना देणेत यावी.

SWATI BHASKAR NAIKNAVARE
Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE
Date: 2026.06.06 17:32:03 +0530

राजगुरूनगर–खेड
दिनांकः०६/०६/२०२६

**(स्वाती भा. नाईकनवरे–गरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
कोर्ट नं.१, खेड, जि.पुणे.

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word for the word as per original Order/Judgment. | | |
| Name of Steno | :- | Y.P. Ambure, Steno (Grade-3) |
| Court Name | :- | S.B. Naiknavare-Garad<br>Jt. CJJD & JMFC,<br>Khed-Rajgurunagar, Pune |
| Date of Order/Judgment | :- | 06/06/2026 |
| Signed by PO on | :- | 06/06/2026 |
| PDF uploaded on | :- | 06/06/2026 |